## कोरोनाने सोलापुरात महिलेचा मृत्यू
### एकाचदिवशी आढळले ८ नवे रूग्ण

**सोलापूर :** शहरात एकाच दिवशी ८ रुग्ण आढळून आले. दरम्यान, शहरातील एका ८० वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची नोंद सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या अहवालात झाली आहे. सध्या सोलापुरातील कोरोना रुग्णांची संख्या १५ इतकी झाली आहे. सोमवारी १२६ जणांची कोरोना तपासणी करण्यात आली. त्याचा अहवाल मंगळवारी दुपारी प्राप्त झाला. त्यात रॅपिड अँन्टीजेन टेस्टचे २८ तर आरटीपीसीआर टेस्ट ९८ जण होते. त्यापैकी ११८ जणांचा कोरोना अहवाल निगेटिव्ह आला असून ८ जणांचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. यात तीन पुरुष तर ५ महिलांचा समावेश आहे. रेल्वे लाईन परिसातील बुबणे चाळीतील एका ८० वर्षीय वृद्धेचा मृत्यू झाला. तिला दमा आणि पक्षघाताचा आजार होता.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड



शिवशक्ती आयुर्वेदिक वैद्य दवा




• मुळव्याध • मुतखडा • गजकर्ण • ईसभ • अंग खाजणे • गुडघे दुखी • अंग दुखी • कंबर दुखी • दमा, कफ • पित्त • अॅसिडीटी • पोट दुखणे • तळपाय जळजळ करणे • जेन्टस रोग, शुक्राणु वाढणे • गुप्तरोग इलाज होईल.

• डोकेदुखी • तोंड येणे • दात मजबुत करणे • चेहरा गोरा होणे • कान, डोळे • तोंड इलाज होईल. • अंग खाजवणे • पॅरालिसिस दवा मिळेल. • लघवी घडी घडी येणे • लेडिज गुप्त रोग & विवस सुरळीत येणे

एस.एन.कोळी

मो.7588610460 / 8208035207

भद्रावती पेठ, HDFC बँकेसमोर, अक्कलकोट रोड, सोलापूर



www.surajyadigital.com | बुधवार, दि. १५ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १६५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


# अधिकारी दालनात | कर्मचारी आंदोलनात | नागरिक उन्हात

# संपकऱ्यांचे एकच मिशन हवी जुनी पेन्शन



**कामकाज ठप्प :** वरिष्ठ अधिकारी संपात सहभागी झाले नाहीत. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी आपापल्या दालनात बसून होते. मात्र कामकाज करणारे कर्मचारीच संपावर गेल्यामुळे दैनंदिन कामावर परिणाम दिसून आला. बहुतांश सरकारी कार्यालयातील कामकाज दुपारपर्यंत ठप्पच होते. त्यामुळे ग्रामीण भागातून विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांना आल्या पावली रिकाम्या हाताने परतावे लागले.

✔ सुराज्य/सोलापूर

**ज्या ज्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक सन २००५ नंतर झाली आहे; त्यांना पेन्शन योजना लागू नाही. अशा कर्मचाऱ्यांनी जुन्या पेन्शनसाठी राज्यस्तरीय आंदोलनाचे हत्यार उपसले असून मंगळवारी आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी अधिकारी दालनात, कर्मचारी आंदोलनात आणि नागरिक मात्र उन्हात ताटकळत बसल्याचे चित्र जिल्हाभरात दिसले. दुसरीकडे मात्र 'कोण म्हणतंय देत नाही; घेतल्याशिवाय राहत नाही' अशा घोषणांनी जिल्हा परिषदेसमोरील पूनमगेट परिसर आंदोलकांनी दणाणून सोडला.**



### जिल्हाधिकारी कार्यालयात फक्त ९७ कर्मचारी हजर

जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी, कर्मचारी अशी १४५९ कर्मचाऱ्यांची संख्या आहे. कार्यरत असलेल्या ११७६ कर्मचाऱ्यांपैकी ३२ कर्मचारी पूर्वपरवानगी घेऊन रजेवर गेले होते. उर्वरित १०४७ कर्मचारी अधिकारी संपात सहभागी होते. या संपकाळात ९७ कर्मचारी विविध विभागात कार्यरत असल्याचा अहवाल विभागीय आयुक्तांना निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांच्या कार्यालयाच्या वतीने सादर केला आहे.

### आरोग्य विभाग सलाईनवर

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय व राज्य कामगार विमा रुग्णालयातील जवळपास साडेतीन हजार कर्मचारी (वर्ग तीन-चार) मंगळवार पासूनच्या बेमुदत संपात सहभागी झाले. रुग्णसेवा करणारे आरोग्य विभागातील कर्मचारीच या संपात सहभागी असल्याने यंत्रणा कोलमडली आहे.

### महापालिकेचे ४२ टक्के कर्मचारी संपात

या संपामध्ये सोलापूर महापालिकेतील एकूण ३ हजार ४१२ कर्मचाऱ्यांपैकी १ हजार ४५६ कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. केवळ ४२ टक्के कर्मचारी हे या संपात सहभागी झाले होते. उर्वरित ५८ टक्के कर्मचारी हे कामावर हजर असल्याचे दिसून आले. शासन निर्देशानुसार कामावर गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत यांनी दिली.

## पेट्रोलने पेटवून घेतलेल्या विवाहित तरुणाचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

एमआयडीसी परिसरातील आशा नगरात राहणाऱ्या राजकुमार सिताराम लिंबोळे (वय २८) याने स्वतः अंगावर पेट्रोल ओतून पेटवून आत्महत्या केली. ७ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास त्याने अंगावर पेट्रोल ओतून पेटवून घेतले होते.

त्याला देविदास लिंबोळे (काका) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तो मंगळवारी सकाळी मरण पावला. मयत



राजकुमार हा रिक्षा चालक होता. कांही दिवसापूर्वी त्याची पत्नी घरातून निघून गेली होती. त्याच्या पश्चात पत्नी आणि मुलगा असे परिवार आहे. दारूचा नशेत त्याने हा प्रकार केला . अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली. सहाय्यक निरीक्षक चौधरी पुढील तपास करीत आहेत.

## हार्दिककडे एकदिवसीय संघाचे नेतृत्त्व

**मुंबई :** ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी मालिका जिंकण्यात टीम इंडियाला यश आले. आता भारतीय संघाची नजर एकदिवसीय मालिकेवर आहे. १७ मार्चपासून एकदिवसीय मालिका सुरु होणार आहे. पहिल्या एकदिवसीय सामन्यात रोहित शर्मा कौटुंबिक कारणांमुळे अनुपस्थित असेल, अशा परिस्थितीत हार्दिक पांड्या भारताच्या वनडे संघाचे नेतृत्व करेल. दरम्यान पांड्याचा टी-२० क्रिकेटमधील कर्णधारपदाचा रेकॉर्ड चांगला आहे, परंतु आता तो प्रथमच एकदिवसीय संघाची जबाबदारी स्वीकारणार आहे.

## उदय पाटील यांचा २१ मार्चला भाजपमध्ये प्रवेश

✔ सुराज्य/सोलापूर

**लिंगायत समाजाचे युवा नेते उदय पाटील हे मंगळवार, १ मार्च रोजी मुंबई येथे भाजपच्या प्रदेश कार्यालयात उपमुख्यमंत्री देऊन देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि आ.श्रीकांत भारतीय यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.**

भाजप महाविजय २०२४ चे प्रदेश संयोजक श्रीकांत भारतीय यांनी १४ फेब्रुवारी पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. त्याचवेळी पाटील यांचा भाजपप्रवेश निश्चित झाल्याचे मानले जात होते. पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे पक्षाची ताकद निश्चितपणे वाढणार आहे. २००३ मध्ये उदय पाटील यांनी शहर व जिल्ह्यात आर. पी. ग्रुपच्या जवळपास ५०० शाखा स्थापन करून युवकांची मोठी फळी उभी केली होती. २००४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या विरोधात त्यांनी विधानसभा निवडणूक अपक्ष म्हणून लढवली होती. त्यावेळी त्यांनी ३२ हजार मते घेतली होती. पुढे शिंदे यांच्याशी त्यांचे सलोख्याचे संबंध निर्माण झाले. त्यानंतर २००८ मध्ये त्यांच्यावर युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली होती.

मात्र, फार काळ ते काँग्रेसमध्ये रमले नव्हते. त्यानंतर त्यांनी दादाश्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून धार्मिक आणि सामाजिक कार्याला सुरुवात केली. सर्व जिल्ह्यात त्यांचे मान्यवरांसोबत असलेले संबंध पाहता पक्षाला त्यांचा निश्चितपणे फायदा होईल असे दिसते.



## बसमधून प्रवास करताना २ लाखांचे दागिने गायब

**मोहोळ :** पंढरपूर ते कुरुल एसटी बसने प्रवास करत असताना पर्समध्ये ठेवलेले एक लाख नव्वद हजाराचे दागिने चोरून नेल्याची घटना सोमवारी सायं सव्वा पाच वाजणेच्या सुमारास घडली.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या फिर्यादीनुसार बाई हरिदास नगरे या सोमवारी पंढरपूर येथे लग्नासाठी गेल्या होत्या. येताना एसटी बसने प्रवास करत असताना त्यांच्याजवळ यांच्यासोबत त्या येत होत्या. त्यांनी त्यांच्या जवळील दागिने पर्समध्ये ठेवले होते गाडीमध्ये गर्दी आणि धक्का बुक्की देखील होत होती खाली उतरत असताना दोन महिला धक्का बुक्की करीत खाली उतरून निघून गेल्या होत्या. त्यामुळे त्यांना शंका आल्याने त्यांनी पर्सकडे पाहील असता चैन उघडी होती व त्यात ठेवलेले दागिने पाहिले आता दागिने गायब झाले होते. ही घटना सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास त्यांच्या लक्षात आले सोन्याची मनी मंगळसूत्र २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पट्टीतील वाकी बारा ग्रॅम वजनाचे सोन्याची नेकलेस असा एक लाख ८९ हजार दोनशे रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. या घटनेचा तपास मोहोळ पोलीस करीत आहेत.

## राज्यात पुढचे पाच दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळीचा इशारा
### १८ मार्चपर्यंत अॅलर्ट जारी

✔ सुराज्य/मुंबई

राज्यात पुढील पाच दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाकडून १४ मार्चपासून ते १८ मार्चपर्यंत अॅलर्ट जारी करण्यात आला आहे. या काळात विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मागील पंधरवड्यात दुसऱ्यांदा अवकाळीचा फटका शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कापणीला आलेल्या पिकांचं नुकसान होण्याचा अंदाज आहे. नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर जिल्ह्यात काही ठिकाणी गारपिटीसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १५ मार्च रोजी धुळे, जळगाव, नाशिक, औरंगाबाद आणि जालन्यात काही ठिकाणी गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १६ मार्च रोजी विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यासाठी ऑरेंज अॅलर्ट जारी करण्यात आला आहे. १६ मार्च रोजी महाराष्ट्रात कोकणासह सर्वत्रच पावसाचा इशारा देण्यात आला आहे. १६ मार्च रोजी जळगाव, अहमदनगर, पुणे, औरंगाबाद जिल्ह्यांना ऑरेंज अॅलर्ट जारी, वादळी वाऱ्यासह गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे.१६ मार्च रोजी अकोला, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम आणि यवतमाळमध्ये काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह गारपिटीची शक्यता आहे.



**राज्यभर हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता**

मेघगर्जनेसह वादळ आणि येत्या तीन ते चार तासात जळगाव जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी ३०-४० किमी प्रतितास वेगाने वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी घराबाहेर पडताना खबरदारी घ्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

## अनैतिक संबंधाच्या संशयावरून तरुणास पळवून नेऊन मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर


तुझ्याकडे काम आहे असे म्हणत एका तरुणाला दुचाकिवरून पळवून नेऊन काठी आणि लाथाबुक्याने मारहाण करण्यात आली.



ही घटना एमआयडीसी परिसरातील हॉटेल रसिक जवळ सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. निलेश अंबादास आडकी (वय २७. रा. जुना विडीघरकुल असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. निलेश आडकी हा काल सायंकाळी सागर चौकात थांबला होता. त्यावेळी शंकर गडगी, दत्तू गुंडला, श्रीकांत सोमा, आणि सागर माने या चौघांनी त्याला तुझ्याकडे काम आहे असे म्हणत त्याला दुचाकिवर बसून घेतले. त्यानंतर त्याला रसिक हॉटेल समोरील शेतात नेऊन गल्लीतील महिलेसोबत लफडे का करतो. असे म्हणत मारहाण केली अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तो परत आलाय...

| कल्याण |
| --- |
| 479-00-145 |

| मेन बाजार |
| --- |
| 234-92-679 |

## मुंबईत आज महाविकास आघाडीची रणनिती ठरणार
### शिंदे- फडणवीस सरकारच्या विरोधात आखणार प्लॅन

▸ **पवार, ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, थोरातांचे मार्गदर्शन होणार**

✔ सुराज्य/दीपक शेळके

कसबा पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीने एकत्र निवडणूक लढवल्यामुळे भाजपाचा पराभव झाला त्यामुळे आत्मविश्वास वाढलेल्या महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी यापुढे राज्यात शिंदे-फडणवीस सरकारला आगामी स्थानिक स्वराज्य संस्था इतर निवडणुकांमध्ये कोंडीत पकडण्यासाठी बुधवारी मुंबईत महाविकास आघाडीतील सर्व पक्ष निरीक्षक, जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष यांची संयुक्त बैठक होणार आहे. या बैठकीत शिंदे फडणवीस सरकारच्या विरोधात रणनीती ठरली जाणार आहे.

यामध्ये आघाडीतील सर्व नेते मंडळी मार्गदर्शन करणार आहेत. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात दुपारी दोन वाजता ही बैठक होणार आहे. या बैठकीत माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री थोरात यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व पक्षाचे प्रमुख मार्गदर्शन करत राज्यातील शिंदे - फडणवीस सरकारच्या विरोधातील रणनीती ठरवली जाणार आहे. महाविकास आघाडीचे

**आगामी काळात राज्यामध्ये महाविकास आघाडीच्या माध्यमातून संयुक्त मेळावे घेतले जाणार आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून शिंदे - फडणवीस सरकारला कोंडीत पकडले जाणार आहे. पोट निवडणूकी प्रमाणे एकत्र लढल्यास यांचा फायदा भविष्यात होणार असल्याने ही राज्यातील सर्व पदाधिकाऱ्यांची पहिली संयुक्त बैठक होणार आहे.**

महाविकास आघाडी

सरकार पयाउतार झाल्यानंतर राज्यांमध्ये आलेल्या शिंदे फडणवीस सरकारच्या नंतर राज्यात एकच सत्ता संघर्ष उफाळून आला आहे. या सरकारच्या विरोधात महाविकास आघाडीने एकत्र लढत पोट निवडणुकीमध्ये चांगला दे धक्का दिला आहे. एक दिलाने एक जोमाने लढा दिल्यामुळे ठाणे, नागपूर पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांमध्ये सुद्धा एकजुटीचा परिणाम दिसून आला.

त्यानंतर कसबा पोटनिवडणुकीमध्ये महाविकास आघाडीने एकत्र भाजपाला कोंडीत पकडल्यामुळे भाजपाच्या बालेकिल्ल्यात म्हणजे कसब्यामध्ये भाजपाचा उमेदवाराचा धक्कादायक पराभव झाला. या पराभवानंतर आत्मविश्वास वाढवलेल्या महाविकास आघाडीच्या नेते मंडळींनी आता आगामी भविष्यकाळामध्ये होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी एकत्रच राहण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे बैठकीला महत्त्व प्राप्त झाले आहे.